Lyceum India Journal of Social Sciences | e-ISSN: 3048-6513
Peer-reviewed • Indexed • Open Access • Monthly Online Journal
Vol. 3, No. 12 | October 2026
DOI: 10.5281/zenodo.23758352

# स्वामी विवेकानंदांची वैश्विक धर्म संकल्पना आणि त्याचे महत्त्व

*डॉ.उद्धव न.कांबळे*[1]

[1] सहायक प्राध्यापक-तत्त्वज्ञान, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर, ई-मेल-unkamble27@gmail.com

**सारांश:**

धर्माचे खरे रहस्य लोकांना समजत नव्हते व म्हणून लोक धर्माच्या नावाखाली बाह्य यांत्रिक कर्मकांड करण्यात, उपासतापास, श्राद्ध, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा व मंदिरातून होणाऱ्या पूजा, कीर्तन, प्रवचने करण्यात व ऐकण्यातच खरा धर्म सामावलेला आहे असे समजून त्यांच्याच जंजाळात अडकून पडलेले होते, व अजूनही तोच पोथीनिष्ठ धर्म, तीच पुराणप्रियता लोकजीवनात सर्वत्र कार्य करीत असताना दिसते. पण हे धर्माचे खरे सार व हार्द नाही याची प्रथम जाणीव तीव्रतेने विवेकानंदांना झाली. त्यांनी खऱ्या धर्माची या बाहय उपचारांपासून सुटका करण्याचा मार्ग दाखविला. त्यांच्या मते, धर्म ही मानवाच्या जीवनाची महत्त्वाची गरज आहे. जगण्यासाठी मानवाला जशी अन्न, पाणी, हवा, निवारा, वस्त्र यांची गरज असते तशीच धर्माचीही गरज असते. नुसते खाऊन-पिऊन व सुखचैनीत लोळून माणसाला खरे समाधान मिळत नाही. केवळ भौतिक सुखसमृद्धीची साधने मिळाल्याने मानवाला खरे समाधान लाभते असे नाही. त्याला त्यापेक्षा अधिक, उच्चतर, काहीतरी उदात्त हवे असते; त्याला काहीतरी मोठे, भव्यदिव्य, जीवनाला व मनाला उच्च पातळीवर नेणारे हवे असते. जगातील सर्व धर्म हे चांगलेच आहेत. कोणताही धर्म वाईट नसतो. सर्व धर्माची शिकवण ही योग्य स्वरूपाचीच असते, तिचे आपण सर्वांनी पालन करणे गरजेचे आहे. नीती हाच धर्माचा प्राण आहे, आणि याच भावनेने सर्व मार्गक्रमण करत असतात. कोणीही माझा धर्म श्रेष्ट तुमचा वाईट ही भावना कोणीही ठेवू नये. हे वैश्विक धर्मात अनुस्यूत नसते, असे विवेकानंद म्हणतात. असा व्यापक विचार पुढील पेपर मध्ये व्यक्त केला जाणार आहे.

**मुख्य शब्द :** धर्म , वैश्विक , धर्मनिरपेक्षता , विवेकानंद .

**प्रस्तावना :**

विवेकानंद हे आधुनिक भारताचे पहिले अध्यात्म नेते होऊन गेले. त्यांनी सनातन धर्माचा खरा अर्थ आधुनिक काळाच्या परिभाषेत मांडून दाखविला आणि पुन्हा धर्माचे महत्त्व जगाला समजावून दिले. धर्माला बुद्धिदुष्ट प्रथा, विश्वास, अंधश्रद्धा, यांत्रिक कर्मकांड आणि चुकीचा परलोकवाद यांच्या प्रभावातून मुक्त केले व मानवाच्या आत्म्याला नवा अर्थ प्राप्त करून दिला. त्यांनी जुन्या शास्त्रग्रंथात अडकून पडलेल्या हिंदू धर्माची सुटका करून तो आधुनिक भारतीयांना व पाश्चात्त्यांना समजेल अशा भाषेत समजावून दिला, आणि संपूर्ण मानवसंस्कृती, मानवाचे संपूर्ण ऐहिक जीवन अध्यात्माच्या मजबूत पायावर उभारले तरच मानवाची अनेक प्रकारची दुःखे, दैना, दारिद्र्य, मानहानी, लाचारी व फरफट या सर्वांपासून सुटका

होऊन त्यांच्या भौतिक जीवनात परमेश्वराची दिव्यता खेळविता येईल असे आग्रहपूर्वक व ठामपणे सांगितले. ते आधुनिक भारताची नव्याने उभारणी करणारे पहिले द्रष्टे अध्यात्मवीर व धार्मिक नेते होते. त्यांच्या भाषेत प्रचंड ओज, सामर्थ्य व प्रेरक शक्ती होती. त्यांच्या शब्दात माधुर्य, अर्थगांभीर्य, अनुभूतीची खोली, दृष्टीची विशालता, गूढात झेप घेणारी कल्पनाशक्ती व माणसाच्या हृदयाला हलवून सोडण्याची ताकद होती. त्यांच्या विचारांत नावीन्य, स्वतंत्र प्रज्ञा, भावनेचा ओलावा व संकल्पाचा कणखरपणा व्यक्त झालेला असून त्यांच्या काळात ते एकटे निर्भयपणे जुन्या परंपरांच्या विरुद्ध उभे राहिले. जे जुने, जीर्ण, निरुपयोगी व त्याज्य बनले होते, त्याचा जाहीरपणे निषेध करणारे ते पहिले महापुरुष होते.

भारताला अलीकडे आलेल्या दैन्यावस्थेतून, जाड्यातून, अज्ञानातून, आळशीपणातून व अनेक प्रकारच्या बंधनांतून बाहेर पडण्यासाठी सर्व लोकांना स्फूर्तिप्रद संदेश देणारे ते निर्भय वृत्तीचे, स्वाभिमानी महापुरुष होते. त्यांनी भारतीयांना दिलेला 'उत्तिष्ठ, जाग्रत प्राप्य वरान्नि बोधत' हा संदेश भारतीयांच्या हृदयाला जाऊन भिडला. लोकांत आलेली मरगळ, भित्रेपणा, पौरुषहीनता झाडून टाकून देशाला स्वतःच्या पुरातन वैभवशाली वैचारिक व आध्यात्मिक वारशाची त्यांनी नीट ओळख करून दिली, आणि भारतीयांमधील सुप्त पुरुषार्थ चेतवून, देशाचे व धर्माचे प्रेम पुनरुज्जीवित करून, नवी आधुनिक दृष्टी व प्रेरणा देऊन नव्या भारताच्या निर्मितीसाठी सर्व शक्तीनिशी प्रयत्न करावयास प्रेरणा दिली, आणि अद्वैताचे तत्त्वज्ञान मुळात किती श्रेष्ठ, उदात्त व प्रेरक आहे हे अद्वैताचा सिंहनाद जगाला ऐकवून नव्या भारताच्या निर्मितीची मुहूर्तमेढ रोवली, व कधीही न संपणारी स्फूर्ती व प्रेरणा भारतवर्षीयांना दिली. Genius व Prophet प्रेषक हेच शब्द त्यांचे व्यक्तिमत्त्व व महत्त्व व्यक्त करण्यास योग्य ठरतील

विवेकानंद है आधुनिक भारताला प्रभावी मार्गदर्शन करणारे खरेखुरे अध्यात्मवीर होऊन गेले. आध्यात्यिक व धार्मिक जीवन यांच्यात आतापर्यंत नेहमीच गल्लत केली जात होती. धर्माचे खरे रहस्य लोकांना समजत नव्हते व म्हणून लोक धर्माच्या नावाखाली बाह्य यांत्रिक कर्मकांड करण्यात, उपासतापास, श्राद्ध, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा व मंदिरातून होणाऱ्या पूजा, कीर्तन, प्रवचने करण्यात व ऐकण्यातच खरा धर्म सामावलेला आहे असे समजून त्यांच्याच जंजाळात अडकून पडलेले होते, व अजूनही तोच पोथीनिष्ठ धर्म, तीच पुराणप्रियता लोकजीवनात सर्वत्र कार्य करीत असताना दिसते. पण हे धर्माचे खरे सार व हार्द नाही याची प्रथम जाणीव तीव्रतेने विवेकानंदांना झाली. त्यांनी खऱ्या धर्माची या बाहय उपचारांपासून सुटका करण्याचा मार्ग दाखविला. त्यांच्या मते, धर्म ही मानवाच्या जीवनाची महत्त्वाची गरज आहे. जगण्यासाठी मानवाला जशी अन्न, पाणी, हवा, निवारा, वस्त्र यांची गरज असते तशीच धर्माचीही गरज असते. नुसते खाऊन-पिऊन व सुखचैनीत लोळून माणसाला खरे समाधान मिळत नाही. केवळ भौतिक सुखसमृद्धीची साधने मिळाल्याने मानवाला खरे समाधान लाभते असे नाही. त्याला त्यापेक्षा अधिक, उच्चतर, काहीतरी उदात्त हवे असते; त्याला काहीतरी मोठे, भव्यदिव्य, जीवनाला व मनाला उच्च पातळीवर नेणारे हवे असते. नुसता पैसा, धन, मान, कीर्ती, सत्ता या सर्वांनी अंतिम किंवा परमोच्च आनंद व समाधान लाभत नाही. काहीतरी अधिक (More) व उच्च, श्रेष्ठ पाहिजे असते; आणि असे उच्च प्रतीचे ध्येय, आनंद व समाधान देणारा धर्म असतो अशी मानवाची धारणा असते.

परिपूर्ण जरी सर्व संपदेने
तुझ्याविना परी जीवन हे सुने ।।
अशी माणसाची भावना असते.

विवेकानंदांच्या मते, धर्माच्या माणसाला वाटणाऱ्या आकांक्षेमध्ये मुख्यतः अतिभौतिकाविषयी (Super-natural) आकर्षण अनुस्यूत असते. हे जे अतिभौतिक असते ते ईश्वर, ब्रह्म यापैकी काहीही असेल. पण त्याच्यापुढे सर्व भौतिक समृद्धी, वैभव, यश, अगदी साम्राज्य सुद्धा फिके वाटू लागते. मानवी मनाला सर्व बंधनांतून मुक्ती हवी असते. जे काही अनंत, असीम, अमेय व चिरंतन टिकणारे असते त्याची तहान असते. रवींद्रनाथांनी त्यांच्या अनेक गीतांतून ही ओढ व्यक्त केलेली आढळते.

अशांत मी मनी सदा,
जगी न रंगतो कदा दूर दूर जे वसे,
तदर्थ तृषित सर्वदा ।।
अनन्ता बघाया तुला मी भुकेला व्याकूळ
हा जीव, तव दर्शनाला ।।

यांसारख्या ओळी मानवाला अनंत प्रभूविषयी वाटणारी ओढ व प्रेम दर्शवितात. मानवाला केवळ काही भौतिक संपत्ती, जमीनजुमला,' मालमत्ता जमा करण्याने पूर्ण समाधान लाभत नाही. म्हणजे मिळविण्यापेक्षा व कमाई करून साठविण्यापेक्षा (Having) माणसाला मनाने, आत्म्याने अधिक मोठे होण्यात (Becoming) उच्च दर्जाचे समाधान वाटत असते. माणसाला काहीतरी उच्च पातळीवरचे जीवन हवे असते. त्याच्यापुढे सर्व भौतिक समृद्धी, विषयसुखे, मानमरातब गौण वाटतात, बेचव वाटतात, खुजे वाटतात. माणसाला सर्वांना व्यापून राहणारे असे एक भव्य दिव्य ध्येय प्राप्त होण्याची अनावर इच्छा असते, मग ते निर्गुण ब्रह्म असेल की मानुष रूपातील ईश्वर असेल, किंवा एखादे सार किंवा नियम असेल. म्हणून विवेकानंदांच्या मते, खऱ्या धर्माचे कार्य माणसाच्या ठिकाणी आध्यात्मिकता (Spirituality) जागी करण्याचे असते. आध्यात्मिकता हीच दिव्यता (Divinity) असते. आध्यात्मिकतेत जे जे मानवाच्या वैषयिकतेच्या व बौद्धिकतेच्या अतीत, त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असते ते सामावलेले असते. माणसाला आपल्या सर्व प्रकारच्या जीवनाच्या मर्यादांची जाणीव होते व त्या असहय वाटू लागतात, ती बंधने वाटू लागतात; मर्यादा म्हणजे सान्तता. त्या सान्ततेच्या शृंखलांतून मुक्त होऊन अनंततेत अवगाहन करावेसे वाटते. जीवनात इतर मिळालेले सर्व पार्थिव धन, उपलब्धी गौण व फिक्या वाटू लागतात, आणि 'दूर दूर जे वसे' त्यांची ओढ वाटू लागते. ते जे अनंतत्व असते ते भव्यदिव्य असते. त्याच्याशी एकरूप होण्यासाठी मानवाचे मन तळमळू लागते; ती त्याची आध्यात्मिकता असते. अशी एक अनाकलनीय हुरहूर मानवाच्या मनाला अशांत करते, एक आगळी हुरहूर चित्ताला व्याकूळ करते आणि मग ते चित्त अशांत होऊन स्वतःलाच विचारते

कोणास्तव ही हुरहूर, हृदया मम आकुल करते
दूर दूर कोठे माझ्या, जीवाला घेऊन जाते
त्या अनंत प्रभुला का ती, भेटाया जीवा नेते
का युगायुगाचा स्वामी
तो चराचराचा प्रेमी
बोलावी आपुल्या धामी
आकर्षत माझी नाव ? हुरहुरला माझा जीव

अत्यंत प्रामाणिक व भावनाशील मानवाला अशी व्यथा नित्य अस्वस्थ करीत असते. त्याला जे थोर, भव्य असे काही हवे असते ते नेमके काय हे विचाराने समजत नाही. त्याचे विचार, त्याची बुद्धी कुंठित होते आणि मग ते म्हणते

बुद्धीचा घेउनि दीप, धुंडितो तया मी जगतात
पृथक् घेउनिया वस्तू, बसतो तिजला छेदीत संबंध तिचा मी लावी, पूर्णाच्या मग समवेत
परि हाय जमेना काही
ते अखंड दर्शन नाही
तो अनंत नाही नाही
लागेना त्याचा ठाव, हुरहुरला माझा जीव ।

असे हे अतिभौतिकाचे म्हणजे ईश्वराचे आकर्षण मानवाला त्याच्या सर्व भौतिकाविषयींच्या प्रेमातून आसक्तीतून बाहेर काढते व भौतिकाच्या किंवा पार्थिवाच्या अतीत नेते. धर्मभावनेचे मूळ मानवाला वाटणाऱ्या अशा अस्वस्थतेत व अतीताच्या आकर्षणात असते, आणि या धर्मभावनेने मानवाला थोरपण प्राप्त होत असते. मानवाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राण्याला अशी ओढ अशी अस्वस्थता व असे आकर्षण अनुभवायला येत नाही.

## खरा धर्म:

विवेकानंदांना अभिप्रेत असलेल्या धर्माची, सच्च्या धर्माची अशी भावना असते. खरा धर्म मानवाला सर्व सान्ततेच्या शृंखलांतून मुक्त करू पाहतो. म्हणून जसे काही भौतिकवादी तत्त्वज्ञ उथळपणाने धर्माला झूठ ठरवू पाहतात, तसे विवेकानंद धर्माला कमी लेखत नाहीत. धमनि विज्ञान व भौतिक उन्नतीला प्रोत्साहन न मिळता माणसाची प्रगती रोखली जाते, भौतिक समृद्धी न वाढता कमी होत जाते व भौतिक जीवन त्यामुळे दीन, दरिद्री बनू लागते अशी टीका धर्मावर केली जाते. तिला उद्देशून विवेकानंदांनी म्हटले आहे की, धर्म ही मानवी जीवनाची व मानवसंस्कृतीची कधीही न टाळता येण्यासारखी आणि नित्य वाटत राहणारी गरज आहे व ती तशीच राहील. आतापर्यंत धमनिच माणसात मनुष्यत्व टिकवून ठेवले आहे, मानवसंस्कृतीची धारणा केलेली आहे व तो कधीही नष्ट होऊ शकणार नाही. विवेकानंदांनी म्हटले आहे, "हे चांगले असो की वाईट असो, धर्माचा आदर्श भारतात हजारो वर्षे वाहात राहिलेला आहे. त्याने सर्व वातावरण पुरेपूर भारून टाकलेले आहे, तो धर्म आमच्या रक्तातच भिनून राहिला आहे, आमच्या रक्तवाहिन्यांतील प्रत्येक थेंब त्याने प्रस्फुरित केलेला आहे, आमच्या प्रकृतीशी तो एकरूप झालेला आहे, आणि आमच्या जीवनांचा तो प्राण होऊन राहिलेला आहे. असा

धर्म आमच्या जीवनातून कसा घालवून देता येईल ? गंगामातेने आपल्या हिमाच्छादित भूमीत परत जाऊन दुसरा एखादा मार्ग नव्याने आक्रमावा असे का तुम्हाला वाटते ?"

अशा रीतीने धर्म हा भारतीयांच्या नसानसात, रक्तात, हाडामासात आज कित्येक शतके भिनून राहिलेला आहे. तो आमचा प्राण, जीवनसत्त्व होऊन राहिलेला आहे. त्याने आमचा पिंड बनविला आहे, आत्म्याची धारणा केलेली आहे व म्हणून तो आमच्या जीवनातून कधीही अस्तंगत होऊ शकणार नाही. आमचा धर्म हा आमच्या संस्कृतीचा मजबूत पाया आहे व तोच जर कोसळला तर आमच्या संपूर्ण सामाजिक व राष्ट्रीय जीवनाची टोलेजंग इमारत कोसळल्याशिवाय कशी राहील ? असे विवेकानंदांचे धर्माच्या कार्याविषयी व महत्त्वाविषयी महत्त्वाचे चिंतन आहे.

विवेकानंदांनी आणखी असेही म्हटले आहे की, इंग्रज मनुष्य धर्म राजकारणाच्या माध्यमातून, अमेरिकन मनुष्य समाजसुधारणेच्या माध्यमातून समजू शकतो. पण आम्ही (भारतीय) मात्र राजकारण व समाजशास्त्र धर्माच्या माध्यमातूनच समजू शकतो. म्हणजे धर्म हा भारतीय जीवनाचा व विचाराचा केंद्रबिंदू व गाभा आहे. जीवनाच्या विविध अंगांचे मूल्यमापन स्वतंत्रपणे न करता धर्माच्या निकषावरून केले जाते. अर्थ व काम हे पुरुषार्थ धर्माच्या आदर्शांनी नियंत्रित केले जातात. जे धर्माला अनुकूल व अनुरूप असेल तेच व तेवढेच ग्राहय व आचरणीय मानले जाते, आणि जे धर्माच्या विरुद्ध असेल ते गहर्च व त्याज्य व वर्ज्य समजले जाते. 'धर्मो धारयते प्रजाः।' अशा धर्माकडूनच प्रजेची म्हणजे समाजाची व लोकजीवनाची धारणा केली जाते असे विवेकानंदांनाही वाटते. असा हा धर्म संपूर्ण जीवनाला व्यापून टाकणारा आहे; आणि या धर्माची थोरवी विवेकानंदांनी उच्च रवाने जगाला ऐकविली. धर्म म्हणजे Religion is the manifestation of divinity already in man मानवात आधीपासूनच वसणाऱ्या दिव्यत्वाचा आविष्कार होय अशी धर्माची विवेकानंदांनी केलेली व्याख्या अत्यंत अर्थपूर्ण आहे.

### धर्म म्हणजे संप्रदाय नव्हे:

विवेकानंदांची धर्मविषयक भूमिका संकुचित व हट्टाग्रही नव्हती. धर्म ही मानवाची मुख्य गरज आहे असे म्हणून जगातील सर्व मानवांसाठी अमुक एकच धर्म असावा अशी मात्र संकुचित भूमिका त्यांनी घेतली नाही. सर्व धर्म आपापल्या परीने चांगले आहेत व प्रत्येक धर्म ईश्वरावर श्रद्धा ठेवणारा असल्याचे त्याचे ध्येय उदात्त असतेच असे ते मानतात. मात्र धर्म म्हणजे अमुकच एक संप्रदाय किंवा पंथ असे न मानता मानवाच्या चित्ताचे शुद्धीकरण करणारा, मानवाला संकुचित बंधनांतून बाहेर काढून उदार व व्यापक दृष्टीचा बनविणारा असला पाहिजे असे ते मानतात. प्रत्येक धर्माला आपल्या दृष्टीनुसार व संहितेनुसार कार्य करण्याचे स्वातंत्र्य असावे, पण कोणत्याही धमनि आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत व इतर आपल्यापेक्षा कमी प्रतीचे आहेत असे समजून इतर धर्मांना हिणवू नये. धर्माभिमानाने प्रेरित होऊन धर्मांनी परस्परांशी झगडे करू नये व त्यांचे रूपांतर धर्मयुद्धात वगैरे होण्याचे कारण नाही असे त्यांना वाटते. धर्माचरणाच्या पद्धतीत भेद असावयास हरकत नाही. सर्व धर्म एकाच छापाचे असणे हे सुद्धा धोक्याचे आहे. ते म्हणतात की, विचारात झगडे होणे, विचारांत भिन्नपणा असणे यामुळे विचार करणे जागे राहते. जेव्हा पाणी जोरात खळाळत वाहत असते तेव्हाच त्याच्यात भोवरे तयार होत

असतात; तेव्हाच त्या प्रवाहात जिवंतपण असते. जेव्हा पाणी तुंबते, नुसते भरून राहते तेव्हा त्यात भोवरे तयार होत नाहीत. बदल, परिवर्तन, हालचाल, वेगळेपण होत राहणे हे जिवंतपणाचे लक्षण असते.

**विश्वधर्माचे स्वरूपः**

कोणता धर्म बरोबर व चांगला किंवा कोणता धर्म चूक व वाईट हे कसे ठरविता येईल असा प्रश्न उद्भवतोच. त्याचाही विचार त्यांनी स्वतः केलेला दिसतो. जर धर्म विश्वधर्म म्हणून व्हावयाचा असला तर तो इतका व्यापक होण्यासाठी त्यांच्या मते दोन अटी पूर्ण व्हावयास पाहिजेत. एकतर विश्वधर्म होण्यासाठी त्यात कोणाही व्यक्तीला प्रवेश मुक्तपणे मिळावयास पाहिजे. कोणीही व्यक्ती जन्मताना अमुक एका धर्माची म्हणून जन्माला येत नसते. व्यक्तीने कोणता धर्म स्वीकारावयाचा हे तिने आपल्या आवडी- निवडीनुसार स्वतःच ठरवायचे असते; व त्याप्रमाणे तिला आवडणारा कोणताही धर्म स्वीकारण्यास स्वातंत्र्य असावे. म्हणजे धर्म ही व्यक्तिगत बाब करण्याने म्हणजे वैयक्तिकीकरण (Individualising) करण्याने आपण धर्माला वैश्विक रूप (Universalise) देऊ शकतो. तसेच खऱ्या विश्वधर्माच्या ठिकाणी प्रत्येक धर्मपंथाला समाधान देण्याची क्षमता असावयास पाहिजे. कारण विश्वधर्माच्या ठिकाणी विविध धर्मपंथांतील कलहांच्या पलीकडे जाण्याची क्षमता असावयास पाहिजे. म्हणजेच विश्वधर्मापाशी मनाची विशालता (Broadmindedness) आणि खुले हृदय (Open heartedness) असावयास पाहिजे. सर्वच लोकांसाठी एकाच छापाचा, एकच उपासना पद्धतीचा धर्म असला पाहिजे असा विश्वधर्माचा अर्थ विवेकानंद लावीत नाहीत.

विवेकानंदांच्या मते, विविध धर्मात वेगळेपण असणारच, पण त्यामुळे ते परस्परांच्या विरुद्ध होण्याचे कारण नाही; त्यांनी त्यामुळे परस्परांशी भांडण्याचे व लढण्याचे कारण नाही. अनेक धर्म परस्परविरोधी नसतात, तर परस्परपूरक असतात. धर्माचे सत्य अत्यंत विशाल व व्यापक असल्याने वेगवेगळे धर्म त्याच्या काही विशिष्ट अंगांवर आपले लक्ष केंद्रित करतात व त्यामुळे त्याला स्वतःचे वेगळेपण व वैशिष्ट्य प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या मार्गाने खऱ्या धर्मभावनेत विविधता आणून तिच्या समृद्धीत भर घालत असतो, तसेच विवेकानंद म्हणतात की, मनुष्य चुकीकडून सत्याकडे प्रगती करीत नसतो, कमी दर्जाच्या सत्याकडून उच्चतर सत्याकडे प्रवास करीत असतो. धर्माकडे पाहण्याचे भिन्न किंवा वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात व त्या त्या दृष्टीने धर्माचे वेगवेगळे स्वरूप दिसते हे स्वाभाविक आहे. जशा मानव व्यक्ती भिन्न असतात पण मनुष्य मात्र सर्वदूर सारखाच असतो, तसे जगात वेगवेगळे धर्म (संप्रदाय किंवा पंथ) असूनही धर्म हा सर्व मानवांसाठी समानच असतो व असावयास पाहिजे, व त्याला आपण विश्वधर्म (Universal religion) म्हणू शकतो.

स्वामीजींच्या मते, असा विश्वधर्म आधीच अस्तित्वात आहे. जसे विश्वबंधुत्व आधीच अस्तित्वात आहे, परंतु काही माणसांना त्याची जाणीव नसते, तसाच विश्वधर्म तर अस्तित्वात आहेच, परंतु त्याची पुरेशी जाणीव काही धर्माभिमान्यांना नाही. सर्व धर्मामध्ये काही साधारण गुण किंवा लक्षणे असतात असे सांगणे सोपे नाही. कारण प्रत्येक धर्म काही विशिष्ट गुणांवर अधिक भर देतो. मुसलमान धर्म विश्वबंधुत्वावर, हिंदू धर्म आध्यात्मिकतेवर तर ख्रिश्चन धर्म आत्मशुद्धीवर व ईश्वरी राज्यात प्रवेश करण्यावर भर देतो. त्यांची तुलना करून सर्वांमध्ये साधारण गुण किंवा लक्षणे कोणती आहेत हे ठरविणे कठीण

आहे. पण विवेकानंदांना विश्वधर्म म्हणजे एकच वैश्विक तत्त्वज्ञान किंवा एकच वैश्विक पुराण किंवा एकच वैश्विक कर्मकांड असेल असे मान्य नाही. त्या सर्वांच्या बाबतीत अनेक भेद असू शकतील आणि तरीही विश्वधर्म असू शकतो.

विश्वधर्माच्या ठिकाणी मनाची व हृदयाची विशालता असली पाहिजे. विश्वधर्माच्या ठिकाणी स्वीकारशीलता (Acceptance) हा प्रमुख गुण असेल. पण स्वीकारशीलता म्हणजे नुसती सहिष्णुता (Tolerance) नव्हे. कारण सहिष्णुतेत एखादे मत व श्रद्धा चुकीची असूनही ती तशीच असू देण्याचा भाव असतो. पण सहिष्णुतेचे स्वरूप नकारात्मक असते. उलट स्वीकारशीलता ही होकारात्मक (Positive) असते. म्हणून ते म्हणतात की, 'मी कोणत्याही स्वरूपात प्रार्थना करू शकतो, मी मंदिरात, मशिदीत किंवा चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करू शकतो !' विश्वधर्म मानणाऱ्याचे मन व हृदय खुले असते, बंदिस्त नसते. कोणत्याही धर्मग्रंथापासून ते धर्माचे तत्त्व समजावून घेण्यास तयार असते.

तसेच विश्वधर्माकडून सर्व प्रकारच्या मनांचे समाधान व्हावयास पाहिजे. आदर्श धर्मात तत्त्वज्ञान, भावना, कार्य व गूढानुभूती यांच्या दरम्यान समतोल व सामंजस्य असावयास पाहिजे, आणि असा समतोल किंवा सामंजस्य प्राप्त करून घ्यावयाचे तंत्र 'योग' सांगतो. कर्मयोग्याला योग व्यक्ती व संपूर्ण मानवजात यांचे ऐक्य साधून देतो, तर साक्षात्कारी व्यक्तीला जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्य साधून देतो, भक्ताला भक्त व ईश्वर यांच्यात ऐक्य घडवून आणतो, तर तत्त्वज्ञाला सर्व अस्तित्वाची एकता अनुभवायला मदत करतो. 'योग' याचा अर्थ जुळविणे, ऐक्य साधणे असा आहे. पण हा एकतेचा प्रत्यक्ष अनुभव असतो. स्वामीजी म्हणतात, धर्म म्हणजे काही नुसत्या गप्पा, नुसते सिद्धान्त, नुसत्या उपपत्ती नसतो, तर तो प्रत्यक्ष जिवंत अनुभव व साक्षात्कार असतो. धर्म म्हणजे प्रत्यक्ष होणे, जगणे असते. धर्म म्हणजे ज्याच्यावर आत्म्याचा विश्वास किंवा श्रद्धा असते त्याच्याशी एकरूप होणे असते. म्हणजेच त्याचे स्वरूप 'ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति । आणि देवोभूत्वा देवं यजेत् ।' यांतील भावासारखे असते असे म्हणता येईल.

### समन्वयाची दृष्टी:

विवेकानंदांची वृत्ती समन्वय करण्याची होती. त्यांच्या मते, भारतीय धर्मउत्क्रांतीत बौद्ध तत्त्वज्ञान व धर्म यांना महत्त्वाचे स्थान आहे. शंकराचार्यांचा निर्गुण ब्रह्माचा अद्वैत वेदान्त, रामानुजाचार्यांचा भक्तिमार्ग आणि बुद्धाचा मानवधर्म (Humanism), मानव्यवाद या तीन घटकांचे एकत्र संमीलन होऊन त्यापासून भारतात धर्मभावना तयार झालेली आहे. जगात सर्वांत अधिक प्रमाणात आत्मबल भगवान् बुद्धात प्रकट झालेले आहे असे विवेकानंद म्हणतात. जर बौद्ध व हिंदू धर्म परस्परांपासून विलग झाले असले तर त्याचा दोष त्या दोघांकडेही जातो असे त्यांना वाटते. हिंदू धर्माच्या सनातनी वृत्तीच्या प्रतिनिधींनी ताठरपणाची वृत्ती धारण करून बौद्ध धर्माच्या नुसत्या नकारात्मक बाजूवर जोर दिला, आणि मुख्यतः थेरवादी बौद्धांच्या नीट लक्षात आले नाही की बुद्धाची शिकवण उपनिषदांत सांगितलेल्या विचारापासून फारशी भिन्न नव्हती. हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म यांच्यातील संबंध हा यहुदी धर्म व ख्रिश्चन यांतील संबंधासारखा आहे. येशू ख्रिस्त हा ज्यू होता, आणि शाक्यमुनी हा हिंदू होता. ज्यू लोकांनी येशूचा स्वीकार केला नाही, हिंदूंनी मात्र शाक्यमुनीची देवाप्रमाणे पूजा

केली. बुद्धाला अवतार मानण्यात आले. बुद्ध हा येशूप्रमाणे मानवाला पूर्ण करण्यासाठी आला होता, नाश करण्यासाठी नव्हे.

विवेकानंदांना बौद्ध धर्माचे मौलिक महत्त्व, वेगळेपण अमान्य करावयाचे नव्हते, परंतु ते हिंदू विचारांच्या सातत्यावर भर देऊन त्यांतील मर्माचे अखंडत्व दाखविण्याचा प्रयत्न करीत होते. विवेकानंदांना हिंदू धर्म व बौद्ध धर्म यांचे परस्परावलंबित्व दाखवायचे होते. स्वामीजींच्या मते, हिंदू धर्म बौद्ध धर्माशिवाय आणि बौद्ध धर्म हिंदू धर्माशिवाय जगू शकत नाही. "ब्राह्मणांची बुद्धी व तत्त्वज्ञान यांच्याशिवाय बौद्ध धर्म उभा राहू शकत नाही, आणि ब्राह्मण (हिंदू धर्म) बौद्धाच्या हृदयाशिवाय उभा राहू शकत नाही. त्या दोघांचे अलग होणे हे भारताच्या अवनतीचे कारण घडले आहे.

आता ब्राह्मणांची अद्‌भुत बौद्धिक शक्ती आणि भगवान बुद्धाचे हृदय, उदात्त आत्मा व आश्चर्यकारक मानव्य शक्ती यांचा मिलाफ करू या." म्हणजे विवेकानंदांना बुद्धी व हृदय यांच्यात द्वंद्व, विरोध उभा करावयाचा नव्हता, तर उभयतांचे चांगले गुण शोधून काढून त्यांचे महत्त्व लक्षात आणून द्यावयाचे होते, आणि त्यांचे संश्लेषण करावयाची त्यांची इच्छा होती, असे यावरून म्हणता येईल.

बौद्ध धर्म व वैष्णव पंथ मानवाच्या जीवनात भावनांना योग्य ते स्थान देतात आणि अद्वैत वेदान्ताचे क्लिष्ट सद्वस्तुशास्त्र व भावनाशून्य तर्कशास्त्र यांना सौम्य करू पाहतात. विवेकानंद अशा प्रयत्नांची प्रशंसा करतात. एकमेव सत्तेच्या अमूर्त संकल्पनेने मानवजातीची एकता घडवून आणता येणार नाही. भिन्न भिन्न संस्कृती व मते मानणाऱ्या लोकांमध्ये जर दीर्घकाळ टिकून राहणारे ऐक्य घडवून आणावयाचे असेल आणि त्यासाठी जर कशाची आवश्यकता असेल तर प्रेमाची होय. अत्यंत क्षुद्र परमाणूपासून सर्वोच्च आदर्शापर्यंत संपूर्ण विश्व ही प्रेमाची अभिव्यक्ती होय. प्रेम ही विश्वाची प्रेरक शक्ती आहे. प्रेमाच्या प्रभावामुळेच येशू मानव्यासाठी स्वतःचे बलिदानही करतो, तर बुद्ध एखाद्या पशूपुढेही आपले जीवन क्षणात अर्पण करतो. जर जगात प्रेम नसले, प्रेम नाहीसे झाले, तर एका क्षणात जगाच्या ठिकऱ्या उडतील. असे प्रेम ईश्वर आहे, असे स्वामीजी म्हणतात**.**

## संदर्भ ग्रंथ :


१)Lal B.K., (1973)' Contemporary Indian Philosophy, Motilala, Banrashidas, Delhi.

२) Narnavre Vishwanath, ( 1978 ) 'Modern Indian Thought' Orient Longman.

३) Mahadevan T.M.P. & G.V.Saroja(1981)*Contemporary Indian Philosophy, Sterling Publication Delhi.*

४) जोशी गजानन नारायण ( २००५),' आधुनिक भारतीय तत्त्वचिंतक' खंड-११, शुभदा-सारस्वत प्रकाशन,पुणे.

५) स्वामी विवेकानंद ( २०२५ ) 'ज्ञानयोग' सकाळ प्रकाशन,पुणे.


**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*